**Shri. Shivaji Shikshan Prasarak Manda Barshi's**
**Karmaveer Mamasaheb Jagdale Mahavidyalaya, Washi**
**Taluka- Washi, District- Osmanabad (MS)**




==================================================================================

**Name of the Activity: Debate Competition 2021-22**

**For the 47 years our institution organizes a debate competition every year. In the academic year 2021-22, the college organized Debate Competition on "Is Education Beneficial to the Students or Not?" Total 20 students participated in debate competition from various districts like Sangli, Beed, Nanded, Barshi, Latur and Icchalkaranji.**

सकाळ

# ऑनलाइन वादविवाद स्पर्धा

वाशी ता. ३ (बातमीदार) : येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन ऑनलाइन वाद- विवाद स्पर्धा घेण्यात आली. 'शिक्षण विद्यार्थ्यांच्या हिताचे आहे किंवा नाही' या विषयावर ही स्पर्धा झाली. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. रवींद्र कटारे यांनी केले. प्रथम कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या स्पर्धेत वाशी, बार्शी, सांगली, बीड, नांदेड, लातूर आदी ठिकाणच्या एकूण दहा संघाच्या २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेचे प्रथम क्रमांकाचे पाच हजार रुपयांचे पारितोषिक कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयाचा विद्यार्थी मनीष जैन याने मिळवले. द्वितीय क्रमांक नाईट कॉलेज (इचलकरंजी, जि. सांगली) येथील अक्षय इळके तर तृतीय बक्षीस नाइट कॉलेज (इचलकरंजी) येथील तेजस्विनी पांचाळ हिने मिळवले. यावेळी प्रा. केरबा जाधव, प्रा. महेंद्रकुमार चंदनशिवे, प्रा. हनुमंत काळे, प्रा. अजितकुमार तिकटे, प्रा. सुनील आवारे, प्रा. भगवान राऊत आदींची उपस्थिती होती. गुणानुक्रमे आलेल्या विद्यार्थ्यांचे श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीचे सांस्कृतिक विभागप्रमुख जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. रवींद्र कटारे यांनी अभिनंदन केले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून विनोद गादेकर, पोपट गोसावी, अनिल डोके यांनी काम पहिले. प्रा. के. वाय. जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एम. डी. उंदरे यांनी सूत्रसंचालन तर प्रा. भगवान राऊत यांनी आभार मानले.



वाशी : येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात ऑनलाइन वादविवाद स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. रवींद्र कठारे, प्रा. एम. डी. उंदरे, प्रा. महेंद्रकुमार चंदनशिवे, प्रा. सुनील आवारे आदी.

Aurangabad, Osmanabad-Today
04/03/2021 Page No. 3

Shri. Shivaji Shikshan Prasarak Manda Barshi's

**Karmaveer Mamasaheb Jagdale Mahavidyalaya, Washi**

Taluka- Washi, District- Osmanabad (MS)



==========================================================================

**Name of the Activity:** ***Karmveer Lecture Series***

**On the 14th June 2021, the college organised *Karmveer Lecture Series* for the knowledge dissemination and knowledge transfer among the students. This series was organized online from 14th June, 2021 to 21st June, 2021.**

# कर्मवीर व्याख्यानमालेचे आयोजन

वाशी : येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयाअंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पातळीवरील कर्मवीर व्याख्यानमाला १४ ते २१ जूनदरम्यान सकाळी ११ वाजता ऑनलाईन आयोजित करण्यात आली आहे.

१४ जून रोजी ऑनलाईन व्याख्यानमालेचे उद्घाटन अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे डॉ.बी.वाय. यादव यांच्या हस्ते होणार आहे. या ऑनलाईन व्याख्यानमालेमध्ये छत्तीसगड येथील डॉ. नीलेश मोहिते, बिहार स्नेहल जोशी, कश्मीर अधिक सदाशिव कदम, छत्तीसगड येथील प्रणीत सिन्हा, डॉ. ऐश्वर्या रेवडकर (बस्तर छत्तीसगड) आदींचे मार्गदर्शन लाभणार आहे. या ऑनलाईन व्याख्यानमालेमध्ये ऑनलाईन सहभागी होण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.आर.व्ही. कठारे, समन्वयक प्रा.डॉ.बी.एन. देवकते, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ.ए.एस. करडे यांनी केले आहे. ही व्याख्यानमाला झूम मीटिंगवर आयोजित केली आहे.

Shri. Shivaji Shikshan Prasarak Manda Barshi's
**Karmaveer Mamasaheb Jagdale Mahavidyalaya, Washi**
Taluka- Washi, District- Osmanabad (MS)



**Name of the Activity:** *Celebration of Science Day*

**The students of our college actively participated in Science Day. Dr. Gajanana Rashinkar guided the students on this special occasion. He addressed the quintessential importance of science.**



सकाळ

वाशी : विज्ञान दिनादिनिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. डॉ गजानन राशीनकर. यावेळी डॉ. रवींद्र कठारे, प्रा. विश्वास चौधरी, प्रा. आर. आर. जाधव आदी.

# विज्ञान दिनानिमित्त कार्यक्रम

वाशी, ता. २ (बातमीदार) : विज्ञान दिनानिमित्त येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात सोमवारी (ता. एक) कार्यक्रम घेण्यात आला.

प्राचार्य डॉ. रवींद्र कठारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. दरम्यान, विज्ञान प्रश्न मंजूषा स्पर्धेसह पोस्टर प्रदर्शन घेण्यात आले. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील रसायनशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. गजानन राशीनकर यांनी यावेळी मार्गदर्शन केले. डॉ. राशीनकर यांनी कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास व चिकित्सक वृत्ती या विषयावर माहिती दिली. या प्रसंगी प्राचार्य डॉ. रवींद्र कठारे, प्रा. डॉ. सुनील विभूते, प्रा. आर. आर. जाधव, प्रा. के. वाय. जाधव, प्रा. राजाभाऊ बनसोडे, प्रा. डॉ. अनंत पाटील, प्रा. श्रीकांत गपाट, प्रा. अजितकुमार तिकटे, प्रा. छाया नखाते आदींची उपस्थिती होती. प्रा. श्याम डोके यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. विलास गरड यांनी आभार मानले.